Dr. Dattatray Saudagar, Sawant,
Head, Dept. of Political Science,
Arts, Commerce and Science College, Lanja

**टीपा लिहा.**

## १. महाराष्ट्रातील प्रमुख जातिसमूह.

### अ. प्रास्ताविक -

भारतीय सामाजिक स्तरीकरण जातिनिष्ट स्वरुपाचे आहे. वैदिक काळात समाजाची कामाच्या आधारावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णात विभागणी झाली होती. काळाच्या ओघात चार वर्णांची असंख्य जाति उपजातित विभागणी झाली. महाराष्ट्रातील उच्च जाति ब्राह्मण वर्णाच्या आहेत. तर मराठा स्वतःला क्षत्रिय समजतो. अनुसूचित जातिजमाती वैश्य आणि शुद्र या वर्णातल्या आहेत.

पारंपारिक समाजव्यवस्थेत उच्चवर्णीय जाति सर्वात श्रेष्ठ तर अस्पृश्य सर्वात कनिष्ठ मानल्या जात होत्या. या अन्यायकारक समाजव्यवस्थेविरुद्ध दलित जातितील समाजसुधारकांनी संघर्ष केल्याने जातिय राजकारण विकसित झाले, तरीही विविध जातिसमुहात तात्पुरते किंवा कायम स्वरूपाचे समझोते होतात. 'महाराष्ट्र धर्म'च्या संकल्पनेत ब्राह्मण व मराठा जातिचे धुरीणत्व आणि इतर जाति गौण मानल्या. सध्याच्या राजकारणाच्या संदर्भात ब्राह्मण-मराठा संघर्ष दिसत असला तरी सत्ताधिश वर्गाचे ब्राह्मण आणि मराठा हे प्रमुख घटक आहेत. औपचारिक अर्थाने उच्चवर्णीय नेतृत्वाची जागा मराठा नेतृत्वाने घेतली असली तरीही प्रशासन, उद्योगव्यवस्था व शिक्षण क्षेत्रावर उच्च वर्णियांचे वर्चस्व आहे. महाराष्ट्रातील सत्तेच्या या भागीदारीस ‘ब्राह्मण मराठा युती’ असे म्हणतात.

लोकशाही व्यवस्थेत संख्याबळ हा राजकीय प्रभावीपणाचा निकष आहे. महाराष्ट्रात एकून लोकसंख्येच्या ७.५% असलेल्या 'दलितांना' सत्ता वाटपात आपण दुर्लक्षित असल्याचे वाटते. १९६० साली पहिला सत्ता बदल होऊन 'मराठेशाही' प्रस्थापित झाली. थोडक्यात विविध जातिसमुहातील सत्तास्पर्धेची परिणिती जातीयवादी राजकारणात होत असते.

### ब. महाराष्ट्रातील प्रमुख जातिसमूह :

महाराष्ट्रात असंख्य जाति-उपजाति आहेत. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

**१) उच्च वर्णीय :**

ब्राह्मण, गौड सारस्वत, सी. के. पी. पाठारे प्रभू इत्यादी जातींचा उच्च वर्णियांत समावेश करण्यात येतो.

**२) मध्यस्तरीय :**

मराठा कुणबी जातिसमूहाचा मध्यस्तरीय जातित समावेश केला जातो. या व्यतिरिक्त राजपूत, लेवा पाटील या जातिसमूहांचाही या गटात समावेश करण्यात येतो.

**३) कनिष्ठ जाति :**

इतर मागास जातिंची संख्या दोनशेहून अधिक आहे. कुणबी जातिसमुहाचा जरी मराठी कुणबी जातिसमुहात राजकीय कारणास्तव समावेश करण्यात येत असला तरी महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त इतर मागास वर्गात त्यांचा समावेश करण्यात आला आहे. मराठा महासंघाने मराठ्यांचाही या सूचीत समावेश करावा अशी मागणी केली आहे.

**४) दलित :**

५९ अनुसूचित जाती आणि नवबौध्दांचा 'दलित' म्हणून समावेश करण्यात येतो. या व्यतिरिक्त विमुक्त आणि भटक्या जमातीही या गटात समाविष्ट केल्या जातात.

**५) अनुसूचित जमाती :**

४७ आदिवासी किंवा आदिम जमाती मान्यताप्राप्त अनुसूचित जमाती आहेत.

**६) अल्पसंख्य :**

अल्पसंख्य जातींमध्ये मुस्लिम, जैन, बौध्द, पारशी, ख्रिस्ती या धार्मिक अल्पसंख्य गटांचा समावेश करण्यात येतो.

**७) इतर जाति-जमाती :**

यात अमराठी भाषिक गटांचा उदा. उत्तर भारतीय, तेलगू तामिळ, मल्याळी इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

१९३१ च्या जनगणनेत खानेसुमारित जाति-उपजाति हा भाग वगळल्याने तक्ता क्रमांक १ मध्ये विविध जाति-जमातींची देण्यात आलेली आकडेवारी सर्वसामान्य स्वरूपाची आहे. मात्र अनुसूचित जाति, नवबौद्ध, अनुसूचीत जमाती, धार्मिक अल्पसंख्य या संबंधीची आकडेवारी १९९१ च्या जनगणनेनुसार आहे.

तक्ता क्रमांक – १. महाराष्ट्रातील जातसमूह

| अ. क्र. | जाती समूह | प्रमाण |
|---|---|---|
| 1. | उच्चवर्णीय | 4 % |
| 2. | मराठा कुणबी | 41 % |
| 3. | कनिष्ठ जाती | 19 % |
| 4. | अनुसूचित जाती | 7 % |
| 5. | नव बौद्ध | 6 % |
| 6. | अनुसूचित जमाती | 9 % |
| 7. | मुस्लीम | 9 % |
| 8. | इतर अल्पसंख्यांक | 3 % |
| 9. | इतर जमाती | 2 % |

**प्रश्न १. ला. महाराष्ट्रातील प्रभावी जातीसमूहाचे राजकारण स्पष्ट करा. किंवा महाराष्ट्रातील प्रभावी जातीसमूह म्हणून मराठा – कुणबी समूहाचे राजकारण स्पष्ट करा.**

**अ. प्रास्ताविक -**

महाराष्ट्रातील सामाजिक स्तरीकरण जातिनिष्ट स्वरुपाचे आहे. वैदिक काळात समाजाची कामाच्या आधारावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णात विभागणी झाली होती. काळाच्या ओघात चार वर्णांची असंख्य जाति उपजातित विभागणी झाली. महाराष्ट्रातील उच्च जाति ब्राह्मण वर्णाच्या तर मराठा क्षत्रिय व अनुसूचित जातिजमाती वैश्य आणि शुद्र वर्णातल्या आहेत. 'महाराष्ट्र धर्म'च्या संकल्पनेत ब्राह्मण व मराठा जातिचे वर्चस्व असून इतर जाति गौण मानल्या. सध्याच्या राजकारणाच्या संदर्भात ब्राह्मण-मराठा संघर्ष दिसत असला तरी सत्ताधिश वर्गाचे ब्राह्मण आणि मराठा हे प्रमुख घटक आहेत. औपचारिक अर्थाने उच्चवर्णीय नेतृत्वाची जागा मराठा नेतृत्वाने घेतली असली तरीही प्रशासन, उद्योगव्यवस्था व शिक्षण क्षेत्रावर उच्च वर्णियांचे वर्चस्व आहे. महाराष्ट्रातील सत्तेच्या या भागीदारीस 'ब्राह्मण मराठा युती' असे म्हणतात. थोडक्यात विविध जातिसमुहातील सत्तास्पर्धेची परिणिती जातीयवादी राजकारणात होत असते.

**ब. प्रभुत्व असलेला जातिसूमह संकल्पना :**

एम.एन. श्रीनिवास यांनी 'Caste in Modern in India : and other Essays' या ग्रंथात जातिनिष्ट भारतीय राजकारणाचे विश्लेषण करताना प्रभुत्व किंवा वर्चस्व असलेल्या जातिसमुहाची संकल्पना स्पष्ट केली. श्रीनिवास यांच्या मते, स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही व सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारल्याने जातिसमूहांच्या संख्या सामर्थ्याला महत्व प्राप्त झाले. जातिसमूहाचे संख्या सामर्थ्य आणि राजकारणावरील त्यांचा प्रभाव यांतील संबंध स्पष्ट करताना श्रीनिवास यांनी Dominant Cast' (प्रभावी जाती) हा शब्द वापरला. यावरून महाराष्ट्राच्या संदर्भात मराठा कुणबी जातिसमुहाला प्रभावी असे म्हणता येईल.

**क. मराठा - कुणबी जातिसमूह :**

ज्या 'मराठा कुणबी' जातिसूहाचे 'प्रभुत्व' आहे असे म्हटले जाते, त्याची रचना पुढीलप्रमाणे आहे. मराठा कुणबी जातिची रचना, अस्मिता कशी घडली हे पाहताना कुणबी आणि मराठा या शब्दप्रयोगाचे विविध अर्थ निघतात. शेतीवर राबणाऱ्या माणसाला इतर विशिष्ट जातीचा नसेल तर कुणबी मानले जात होते. मासेमारी करणारे कोळी शेती करू लागले की ते कुणबी होत. मराठा हा शब्दप्रयोगही गुंतागुंतीचा व अनेकार्थी आहे. एकीकडे सर्व मराठी बोलणारे मराठा तर दुसरीकडे फक्त 96 कुळांमध्ये जन्म घेणारे मराठा असे दोन प्रकार दिसतात. मराठा राजवटीत सर्व मराठी बोलणारे मग ते ब्राह्मण, भट, सैनिक, शेतकरी, कारागिर, व्यापारी असोत त्या सर्वांनाच मराठा मानले जाई. म्हणूनच सुरूवातीच्या युरोपीय अभ्यासकांना मराठा हा शब्द विशिष्ट जातिवाचक आहे हे जाणवले नव्हते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठा हा शब्द जेव्हा सैनिकी कौशल्य या अर्थाने येत असे तेव्हा तो जातिवाचक नसे. परंतु हाच शब्द मराठा कुटुंबाचे वर्णन करताना विशिष्ट जातिच्या संदर्भात येई. म्हणजेच शिवकालात या शब्दाच्या वापराला जी सहजता व लवचिकता होती ती १९ व्या शतकात संपली. ईस्ट इंडिया कंपनीने जेव्हा प्रतापसिंह भोसले यांना सातारच्या गादीवर बसविले तेव्हा त्यांना आपण रजपूत आहोत, खरे क्षत्रिय आहोत शिवाजी राजांप्रमाणे त्यांना छत्रपती व्हायचे होते. यातून मराठा घराण्यांनी स्वतःला क्षत्रिय म्हणवून घ्यावे की नाही हा वाद निर्माण झाला. ह्यातून राजकीय सत्ता व अधिकाराबाबत ब्राह्मण मराठ्यांमध्ये संघर्ष सुरु झाला. मराठा घराण्यानी मुसलमानांशी संगमत केल्याने त्यांच्यातील शुद्धता संपली म्हणून मराठा घराण्यांना क्षत्रियत्व देता येत नाही असे ब्राह्मण समूहाचे मत होते. मराठा व चित्पावनांमधल्या वादात धार्मिक संस्कारांचा वापर शस्त्रासारखा झाला. ह्याच काळात अनेक शेतकरी कुटुंबांना मराठा म्हणवून घेण्यास उत्तेजन मिळाले. मराठा ह्या शब्दाला स्वतंत्र अस्मिता प्राप्त झाली आणि राज्यकर्ते, शूर योद्धे अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली. याचा परिणाम १९०१ च्या जनगणना अहवालामध्ये दिसतो. कुणबी गटापेक्षा मराठा म्हणवून घेणाऱ्यांची संख्या ह्या अहवालामध्ये जास्त आहे.

१९३१ च्या जनगणनेनुसार मराठी भाषिक प्रदेशात मराठा कुणबी जाती समुहाची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४०% हून अधिक होती. पश्चिम महाराष्ट्रात व कोकणात त्यांची टक्केवारी ४१, मराठवाड्यात ३७ आणि विदर्भात २७ आहे. यापैकी '९६ कुळी' वतनदार मराठे स्वतःला क्षत्रिय समजतात, तर इतर 'मराठे' कुणबी आहेत. कोकणात मराठ्यापेक्षा कुणबी जातीचे प्राबल्य आहे. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या सूचीत 'कुणबी' जातिचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक, आर्थिक स्तरावर जरी मराठा व कुणबी जातिसमूह वेगळे असले तरी राजकारणात सत्ताप्राप्तीच्या प्रक्रियेत त्यांची युती असल्याने त्याला 'मराठा-कुणबी' असे ओळखले जाते.

**ड. मराठ्यांच्या धुरणीत्वाचे विश्लेषण :**

बहुसंख्य मराठी मंडळींच्या प्रखर आंदोलनातून १९६० साली महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. १९६० ते १९७० हा काँग्रेसच्या संपूर्ण वर्चस्वाचा काळ होता. सुमारे ४०% लोकसंख्या असलेली, बहुतांश जमीन मालकांची जात, इतर शेतकरी जातिच्या मानाने इतक्या मोठ्या संख्येने एकसंघपणे उभी असलेली महाराष्ट्रात मराठा ही एकच जात आहे.

मराठी जातीत ‘अभिजन' व 'जन' असले तरी मराठा कुणबी जातिसमुह एकसंघ असल्याचे दिसते. मराठ्यांतर्गत उच्चनीय, वतनदार मराठे व इतर सर्वसामान्य मराठे असे प्रकार असतानाही त्यांच्यात वर्गसंघर्ष झाला नाही. त्याचे स्पष्टीकरण महाराष्ट्राच्या राजकारणाचे अभ्यासक जयंत लेले यांनी त्यांच्या 'Elite Pluralism and Class Rule' या ग्रंथात केले. लेलेंच्या मते, मराठा जातीत वर्गकलह झाला नाही, त्याची कारणे पुढीलप्रमाणे-

- ✓ जातिच्या लवचिक मर्यादा

- ✓ जातिच्या गाभ्याशी असलेली पितृप्राधान्य कुटुंबव्यवस्था
- ✓ इतर जातींच्या संबंधात पूर्वापार चालत आलेली यजमानी परंपरा

मराठा जातीच्या अभिजनांमध्ये आर्थिक, राजकीय वर्चस्वाची जाणीव आहे. त्याबरोबर त्यांचातील सामाजिक, सांस्कृतिक संबंधामुळे ह्या वर्चस्वाला मराठी ग्रामीण जनमानसात हे वर्चस्व न्याय्य अशी मान्यताही आहे. धुरीणत्वाची ही दोन्ही अंगे एकमेकांत पूर्णपणे मिसळून गेलेली आहेत.

मराठा अभिजनांच्या संस्कृती व अर्थव्यवस्थेने जोपासलेल्या परंपरागत शासक प्रवृत्तीचा वारसा महाराष्ट्रात कॉंग्रेसला मिळाला. ब्रिटिशकाळात पेरलेल्या व स्वातंत्र्यानंतर जोमाने वाढलेल्या भारतीय भांडवलशाहीच्या संदर्भात अभिजन मराठा धुरीणत्ववाचा एक नवा आविष्कार झाला. हे धुरीणत्व नव्या लोकशाही राजवटीत पद्धतशीरपणे जोपासले गेले. त्यांचे श्रेय यशवंतराव चव्हाणांना आहे. एका अर्थाने महाराष्ट्रात भांडवलशाहीच्या जन्माच्या वाढीच्या काळात महत्वाची जबाबदारी अभिजन मराठ्यांनी उचलली.

भांडवलशाहीत सर्व निर्मित मालाचे बाजारीकरण होते. त्याचप्रमाणे सामाजिक संबंधांचे बाजारीकरण होणार हे अपेक्षित असते. या प्रवृत्तीचा १९६० ते १९७० मध्ये चव्हाणांच्या नेतृत्वाखाली वाढलेल्या कॉंग्रेस व्यवस्थेत ग्रामीण भागात प्रभाव वाढणार नाही याची दक्षता घेण्यात आली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात अभिजन मराठ्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. मराठा जात एकसंध होण्याचे कारण म्हणजे १९३७ पासून व विशेषतः १९४६ नंतर शेटजी-भटजींच्या राजकारणात बहुजन समाजाचे हित दडपले जाईल अशी भीती निर्माण झाली. या दडपशाहीचे प्रत्यंतर त्यांना १९३७ व १९४६ च्या मुंबई प्रांतांच्या कॉंग्रेसच्या राजकारणात आले. शेटजी भटजींच्या वर्चस्वापासून कॉंग्रेसला मुक्त करणे म्हणजे बहुजन समाजाचे हित जोपासणे, असे केशवराव जेधे व त्यांच्या सहकाऱ्यांना वाटले. त्यातूनच शेतकरी कामगार पक्ष स्थापन झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा. या तत्वाचा उद्घोष करण्यात आला आणि १९६० नंतर चव्हाणांच्या नेतृत्वाखाली मराठा नेतृत्व एकसंघ बनले.

ग्रामीण भागात भांडवलशाहीचा प्रभाव रोखण्याकरिता चव्हाणांनी सहकारी तत्वावर कृषी उद्योगांच्या उभारणीस प्रोत्साहन दिले. चव्हाणांच्या या व्यूहरचनेमुळे भांडवलशाहीची भीती कमी झाली. त्यामुळे शहरात वाढणारी कारखानदारी व ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाच्या सहकारी संस्था यांच्यात टिकाऊ समझोता निर्माण झाला. १९६२ साली पंचायतीराज संस्थांची स्थापना करण्यात आली. सहकारी संस्था व पंचायती राज यंत्रणाद्वारे ग्रामीण जनतेच्या समस्यांचे निवारण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मराठा अभिजनांकडून करण्यात आला. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली १९६० ते १९७० या दशकात मराठ्यांचे धुरीणत्व प्रस्थापित झाले.

**इ. मराठ्यांच्या धुरीणत्वाची मर्यादा :**

१९७० नंतरच्या कालखंडात मराठ्यांच्या धुरीणत्वाच्या मर्यादा स्पष्ट होत गेल्या. त्या खालीलप्रमाणे आहेतः

**१) पक्षश्रेष्ठींचे डावपेच किंवा व्यूहरचना :**

१९६९ च्या काँग्रेसमधल्या फुटीनंतर राजकीय समीकरणे बदलली. राष्ट्रपतीच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्र काँग्रेसने पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला पाठिंबा दिल्याने चव्हाण व इंदिरा गांधी यांच्यातील विसंवादास सुरुवात झाली. देशातील अन्य भागातील श्रीमंत व मध्यम शेतकरी वर्गाच्या नेतृत्वाप्रमाणे, महराष्ट्रातील मराठा जातीचे नेतृत्व आपल्या व्यक्तिगत नेतृत्वाकांक्षा आणि भांडवलशाही विकासाच्या मार्गात अडथळा होणार हे लक्षात आल्यानंतर राज्य पातळीवरील नेतृत्वाचे खच्चीकरण करण्यास सुरुवात झाली. राज्य पातळीवरील प्रबळ मुख्यमंत्री बदलून, राज्य पातळीवर ज्यांचा पाया कामकुवत आहे आणि जे आपल्या हुकूमतीखाली राहतील असे मुख्यमंत्री नेमण्याची व त्यात वारंवार बदल करण्याची पद्धत सुरू झाली. त्या व्यूहरचनेनुसार मराठा अभिजनांना शह देण्याकरिता शंकरराव चव्हाण यांची १९७५ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. इंदिरा गांधीच्या पश्चात हीच व्यूहरचना राजीव गांधी यांनी १९८८ पर्यंत राबविली. या तेरा वर्षाच्या कालखंडात मराठ्यांच्या धुरीणत्वाला शह देण्यात आला. पक्षश्रेष्ठींनी या कालखंडात सात मुख्यमंत्री बदलले. पक्षांतर्गत गटबाजीला प्रोत्साहन देण्यात आले आणि त्यातून मराठा-मराठेतर असा वाद सुरु झाला. मराठेतर नेतृत्वाला आपल्या पाठीशी उभे करण्याचा पक्षश्रेष्ठींनी प्रयत्न केला.

कृषी उद्योगाचे फायदे ज्यांना मिळाले नव्हते असे अनेक घटक शहरात व ग्रामीण भागात होते. त्या सर्वांचा उपयोग करून प्रस्थापित मराठा नेतृत्वाशी सामना देणे शक्य होते. त्याकरिता ह्या घटकांच्या आकांक्षांशी, वंश जातीशी निगडीत असलेल्या अस्मितेशी जोडून देणाऱ्या लोकांतूनच नवे नेतृत्व उभा करण्यात आले. इंदिरा गांधीनी ह्या मार्गाने दलित, मुसलमान, शहरातले असंघटित कामगार, बेकार, सुशिक्षित तरुण-तरुणी ह्यांना 'गरिबी हटाओ'च्या नावाखाली आणि इतर प्रलोभनांनी झुलवायला सुरुवात केली.

या प्रक्रियेत महाराष्ट्रातली जुनी सत्तास्थाने मराठा अभिजनांच्या हातातच राहिली. ह्या नव्या शक्तीचं स्थानिक नेतृत्व करू पाहणाऱ्या नव्या नेतृत्वासाठी काही सोयी करणं आवश्यक आहे. या कामात तत्कालीन मराठेतर मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांनी संजय निराधार योजनेसारख्या अनेक क्लृप्त्या शोधून काढल्या. त्यांनी शहरी कंत्राटदारांकडून जमलेल्या निधीतून नव्या नेतृत्वातल्या लोकांची सोय केली. तरीही मराठा जातीसमुहाचे ग्रामीण भागावरील वर्चस्व महाराष्ट्राच्या राजकारणाचा गाभा बनून राहिले. मराठ्यांचे धुरीणत्व अबाधित राहण्याकरिता शरद पवारांनी १९८६ साली आपला समाजवादी काँग्रेस पक्ष इंदिरा काँग्रेसमध्ये विलीन केला.

## २) हिंदुत्वाचे आव्हान :

मराठ्यांच्या धुरिणत्वाला १९९० च्या दशकापासून 'हिंदुत्व'वादी विचारसरणीचे आव्हान निर्माण झाले. मात्र गेल्या दोन दशकात खेड्यापाड्यातून नवे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांची मुलं मोठ्या प्रमाणात शिक्षित झाली आहेत. फलदायक बागाईत शेती असली तरी सगळया भावांची तिच्यात सोय लागू शकणार नाही हे लक्षात आले आहे. शिवाय यशस्वी शेतीसाठी, जिल्हा किंवा राज्य पातळीवर राजकीय नेते, सरकारी नोकर ह्यांच्याशी संबंध ठेवावा लागतो. ह्या गोष्टींचा विचार करून सुखवस्तू अभिजन मराठ्यांच्या घरातील मुलंही सरकारी नोकऱ्या, राजकारण ह्यात प्रवेश करायला उत्सुक आहेत.

१९९० नंतर आर्थिक वाढीचा दर झपाट्याने वाढतो आहे असा आभास आणि सरकारी खजिने दिवाळखोरीच्या मार्गावर पोचल्याची चिन्हे स्पष्ट होती, शिवसेना छोट्या शहरांत, मोठ्या गावात आणि खेड्यांच्या जवळपास येऊन पोचली होती. 'इतर मागास' तरुणांच्या असंतुष्टतेचे भांडवल करून आरक्षणाला विरोध करण्यात आला. सरकारात असलेल्या काँग्रेसेतरांवर रागावलेल्या मराठा तरुणांचे नेतृत्व काही काळ समाजवादी काँग्रेसद्वारा शरद पवारांनी केले. पण १९८६ मध्ये तेही इंदिरा काँग्रेसमध्ये गेले आणि शेवटी मुख्यमंत्रीही झाले. पवारांच्या 'माघारी जाण्यामुळे' निराश झालेल्या तरुण मराठ्यांचा वर्गही शिवसेनेकडे वळला.

शिवछत्रपतींचा काळ हा सुवर्णकाळ होता अशी आपल्या मराठी मनाची समजूत आहे. त्याकाळात न्याय होता शिस्त होती जनतेबद्दल कैवार होता, कणव होती. असे हे आपलं सामूहिक स्मरण आहे. तसेच ते आपलं भविष्यकाळाबद्दलचं स्वप्नही आहे. ह्या स्मरण स्वप्नाची पार्श्वभूमी करून आजच्या राजकारणाचं विदारक स्वरूप बटबटीपणे दाखवता येते. तशी पार्श्वभूमी निर्माण करण्यासाठी प्रत्येक सभेच्या वेळी शिवसेनेचे सेनापती जणू काही छत्रपतीच धर्मस्थापनेसाठी पुन्हा अवतारत आहेत असा नाट्यपूर्ण आभास निर्माण करतात. शिवछत्रपतीचे शब्द आणि कृतींची आठवण करून देत ते आपला 'वचननामा' सादर करतात. त्यासाठी वेगळया आर्थिक कार्यक्रमांची काही गरज नाही असं अट्टाहासाने सांगतात. आजची काँग्रेस ही लाचार आणि बोलघेवड्या माणसांची आहे असे सांगतांना शिवछत्रपतीच्या बरोबरीने यशवंतराव चव्हाणांच्या समाजवादाचाही उल्लेख करतात. भाजपा युतीने श्रद्धास्थानाचा उल्लेख करून, समस्त हिंदूचे ऐक्य साधून, १९९५ साली शिवसेनेने काँग्रेसची सत्ता म्हणजेच मराठा अभिजनांचे धुरिणत्व मोडून काढले. काही अतिउत्साही विचारवंतानी शिवसेना-भाजपा महाराष्ट्रात मराठ्यांचे जातीय राजकारण संपुष्टात आले आहे, असा निष्कर्षही काढला. युती सत्तेवर आल्यानंतर सर्वसामान्यांचे स्वप्न असलेली 'शिवशाही' काही अवतिर्ण होऊ शकली नाही. शिवशाहीच्या राजवटीत ग्रामीण विकासाला खिळ बसली आहे आणि ग्रामीण जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे हा समज उत्तरोत्तर वाढत गेला.

राज्यकर्ते सहकारी चळवळ नष्ट करण्याबाबत कृतीशील आहे आणि त्यामुळे आपल्या आर्थिक हितसंबंधाना बाधा पोहोचेल असे वाटल्याने ग्रामीण भागातील अस्वस्थता वाढत गेली. शिवशाहीबद्दल भ्रमनिरास झालेल्या ग्रामीण समुदायाला आश्वस्त करण्याची कामगीरी शरद पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी १९९६ ते १९९८ या कालखंडात पार पाडली. त्यामुळे अभिजन आणि काँग्रेस पक्षापासून दुरावलेल्या ग्रामीण जनसमुदायाने आपली शक्ती पुन्हा एकदा काँग्रेसच्या पाठीशी उभी केली आणि १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत ग्रामीण राजकारणावर पुन्हा एकदा काँग्रेसचे वर्चस्व प्रस्थापित झाले. मात्र हे वर्चस्व प्रस्थापित करताना मराठा अभिजनांनी 'यशवंत निती' स्वीकारली असून, मराठेतर जाती-जमातीना अधिकाधिक सामावून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. त्यामुळेच गेल्या दशकात मराठ्यांच्या धुरिणात्वाला हिंदुत्वाने निर्माण केलेले आव्हान परतवून लावण्यात मराठा अभिजन यशस्वी ठरला आहे.

**३) शेतकरी संघटनेचे आव्हान :**

मराठ्यांच्या प्रभुत्वाला १९७८ ते १९८८ मध्ये शरद जोशींच्या शेतकरी संघटनेनेही जबरदस्त आव्हान दिले. शिवसेना व शेतकरी संघटनेने पक्षाधिष्ट राजकारणाबद्दल भ्रमनिरास झालेल्या तरुणांच्या भावनाचा उपयोग करून घेतला. सेनेचा कार्यक्रम बिनकलमी, तर संघटनेचा कार्यक्रम एक कलमी असल्यामुळे बरेचसे मराठा सधन शेतकरीही संघटनेकडे वळले. शेतमालाला रास्त भाव हा कार्यक्रम, त्यांच्या यशासाठी वेगळी आक्रमक तंत्र ह्या दोन्ही कारणांनी शेतकरी संघटना एकदम वाढली. त्यामुळे शेतकरी संघटना प्रभावी वाटत असली तरी संघटनेच्या रस्ताबंदी, गावबंदी, विराटसभा व मेळाव्यांच्या राजकारणातून तिच्या प्रभावाच्या भागातही सर्वसामान्य मतदारांच्या निवडणूकीत फारसा परिणाम झाला नाही. संघटनेचे काही उमेदवार विजयी होण्याचे कारण काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी होती. म्हणजेच शेतकरी संघटनेने मराठ्यांच्या धुरीणत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला असला तरी, मराठा जातीच्या चाणाक्ष मध्यम व श्रीमंत शेतकरी वर्गाने आपले आर्थिक हितसंबंध साधण्याकरिता संघटनेचा वापर करून घेतला असेच म्हणावे लागेल.

**ई. सारांश :**

वरील विवेचनाच्या आधारे असा निष्कर्ष काढता येतो की, मराठा अभिजनाच्या धुरिणत्वाखाली असलेली कॉंग्रेस पद्धत महाराष्ट्रात अजून तग धरून आहे. तर महाराष्ट्रात बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे, कृषिव्यवस्थेवर अवलंबून आहेत, तोवर मराठ्याचे धुरीणत्व टिकून राहणार आहे.

**प्रश्न २. रा. महाराष्ट्रातील कनिष्ठ जातीसमूहाचे राजकारण स्पष्ट करा. किंवा मंडल आयोगानंतरचे महाराष्ट्रातील बदललेल्या राजकारणाची चर्चा करा.**

**अ. प्रास्ताविक -**

महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ उच्च जातींचा प्रभाव होता. ब्राह्मणेतर चळवळीच्या रूपाने राजकीय प्रक्रियेमध्ये बहुजन समाज सहभागी होऊ लागला. परंतु त्यातून मराठा वर्चस्व निर्माण होत गेले. इतर कनिष्ठ जातींना राजकीय सत्तेत दुय्यम स्थान मिळाले. त्यातून कनिष्ठ जातींच्या राजकीय एकत्रिकरणाला सुरुवात झाली. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**ब. कनिष्ठ जातीसमूहाचे राजकारण -**

महाराष्ट्राच्या राजकारणात 1995 पर्यंत मराठा समाजातून आलेले मुख्यमंत्री होते. काही अपवादात्मक परिस्थितीत मराठेतर मुख्यमंत्री झाले. परंतु आमदारांच्या संख्येत मराठा समाजाचे प्राबल्य होते. राखीव जागांमुळे लोकसंख्येच्या प्रमाणात दलित व आदिवासींना प्रतिनिधीत्व मिळत गेले. त्यामुळे कनिष्ठ जातींबद्दल असे म्हणता येते की, ज्या मतदारसंघात ती जात प्रभावी आहे तेथेच नेतृत्वाला संधी मिळाली इतर ठिकाणी ती मिळू शकली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात मराठा वर्चस्वाला काँग्रेस अंतर्गत शह देण्याचे प्रयत्न 1971 नंतर सुरू झाले. परिणामी काँग्रेसमध्ये मराठ्यांचे प्रमाण कमी होऊन कनिष्ठ जातींच्या प्रतिनिधींची संख्या वाढत गेली. त्याला मंडल आयोगाच्या शिफारशीसुद्धा कारणीभूत ठरल्या. 1982 पासून भारतीय जनता पक्षाने सुद्धा महाराष्ट्रात कनिष्ठ जातींच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले. ग्रामीण भागात जनाधार वाढवण्यासाठी कनिष्ठ जातीतील लोकांना उमेदवारी द्यायला सुरुवात केली. त्यांची शिवसेनेबरोबर युती असल्याने शिवसेनेने सुद्धा मराठा जातीच्या उमेदवारांबरोबरच मागास जातीच्या उमेदवारांनाही उमेदवारी देऊ केली. त्यातून विदर्भ मराठवाड्यामध्ये सेना भाजपाला यशही मिळाले. या सर्व प्रक्रियेमधून ओबीसींच्या अस्मितेचे राजकारण सुरू झाले.

**क. मंडल आयोग -**

राज्यघटनेच्या कलम 340 नुसार सामाजिक आर्थिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी राष्ट्रपतींनी 1978 मध्ये मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय आयोगाची नेमणूक केली.1980 मध्ये मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. 1990 मध्ये आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली. मंडल आयोगात पुढील महत्त्वाच्या बाबी होत्या.

- ✓ सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग निश्चित करण्यासाठी आधार ठरवणे.
- ✓ वरीलप्रकारे नागरिकांचे वर्ग निश्चित करून त्यांच्या विकासासाठी उपाययोजना करणे.
- ✓ वरील वर्गांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या सार्वजनिक सेवेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी राखीव जागांची तरतूद करणे.

✓ वरील बाबींवर अहवाल तयार करून राष्ट्रपतींना सादर करणे.

मंडल आयोगाने वरील बाबींचा अभ्यास करून केंद्र सरकारला अहवाल सादर केला. त्यात सामाजिक शैक्षणिक मागासलेपण व गरिबी या दोन गोष्टींवर भर देण्यात आला. मंडल यांनी देशात 3743 जाती व सामाजिक घटकांची मागासवर्गीय म्हणून निश्चिती केली. त्यांची लोकसंख्या 52 टक्के इतकी होती.

**ड. मंडल आयोगाच्या सरकारने स्वीकारलेल्या शिफारसी -**

1. केंद्रशासनाच्या नागरी सेवांमध्ये असलेल्या पदांमध्ये व सेवांमध्ये २७ टक्के जागा ओबीसीकरिता राखीव असतील.
2. या राखीव जागा सरळ भरतीसाठी असतील.
3. गुणवत्तेनुसार भरण्याच्या जागांत वरील राखीव जागा करण्यात येणार नाही.
4. पहिल्या टप्प्यांत ओबीसी म्हणजे ज्या जाती मंडल कमिशन व राज्य शासनाच्या यादीत असतील त्यांनाच 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले' म्हणून समजण्यात येईल.
5. वरील राखीव जागांचे प्रमाणे ७-८-१९९० पासून अमलात येईल.

मंडल आयोगाच्या शिफारसी व्ही.पी. सिंग सरकारने स्वीकारल्यानंतर केंद्र शासनाची अधिसूचना जारी झाल्यानंतर उत्तर भारतात दंगली पेटल्या किंवा पेटविल्या गेल्या. ऑगस्ट १९९० च्या भारत सरकारच्या राखीव जागा २७% ठेवण्यात याव्यात. या अधिसूचनेनंतर जे हत्याकांड झाले त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयातील एक वकील इंदिरा सोवनी यांची रिट अर्ज दाखल करून या अधिसूचनेला स्थगिती द्यावी अशी विनंती १ ऑक्टोबर १९९० रोजी आली. तोपर्यंत मंडळ आयोगाच्या शिफारसीला हरकत घेणारे १० रिट अर्ज दाखल झाले होते. या सर्वांचा एकत्रितपणे निर्णय सर्वोच्य न्यायलयाच्या मुख्य न्यायाधीश एच्. कानिया यांच्या खंडपीठाने बहुमताने दिनांक १६.११.१९९२ रोजी दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रदीर्घ काळ चाललेल्या या वादावर पडदा पडला. या निर्णयामुळे राखीव जागांचे प्रमाण ५०% हून अधिक असणार नाही. तसेच पदोन्नतीकरिता राखीव जागांची तरतूद नाही. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय प्रामुख्याने केंद्रशासित सेवांसाठी, राष्ट्रीयकृत बँका, आयोग, निगम व उपक्रम इ. ना लागू होता. केंद्राने याप्रमाणे अधिसूचना काढल्यावर राज्यशासन त्या धोरणानुसार आपापल्या ओबीसीसाठी जागा राखीव ठेवतील. महाराष्ट्रात अनुसूचित जाती जमातींसाठी अनुक्रमे १३% व ७%, विमुक्त व भटक्या जमातींसाठी ४% व इतर मागासवर्गियांसाठी १०% असे राखीव जागांचे ३४% प्रमाण आहे. केंद्रसरकारच्या सेवांमध्ये आतापर्यंत फक्त अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव जागा होत्या. या व्यतिरिक्त माजी सैनिकांसाठी, आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांसाठी, अपंगांसाठी व प्रकल्पाबाधित व्यक्तींसाठी एकूण २३% राखीव जागा ठेवण्यात येतात. न्यायालयाच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय राखीव जागांच्या प्रमाणात वाढ होईल.

**इ. मंडल आयोगाच्या शिफारशी नंतर महाराष्ट्राच्या राजकारणातील फेरबदल -**

मंडल आयोगाच्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर त्याचे विविध परिणाम झाले. मंडल आयोगाच्या शिफारसींची कार्यवाही करण्याचा निर्णय राष्ट्रीय स्तरावरील जनता दलाच्या सरकारने घेतल्याने महाराष्ट्रातील जनता दलाच्या अपेक्षा वाढल्या. त्यातून इतरमागास जातींमध्ये नवचैत्यन्य निर्माण झाले. पुढे मागास जातींनी जनता दल, डाव्या पक्षाच्या पाठीशी आपली ताकद उभारायला सुरूवात केली. विदर्भात अन्यमागास जाति, मागावर्गीय व मुस्लिम यांची मिळून ७५ टक्के मतदारसंख्या होत असल्याने ती ताकद जनता दल व मित्रपक्षांना मिळाली. तर पराभवाच्या भीतीने अन्य पक्षानी उमेदवारांची यादी तयार करताना इतर मागास जातीच्या उमेदवारांना स्थान दिले. त्याची प्रचिती १९९१ च्या लोकसभा निवडणूकीच्या वेळी आली. १९९१ पर्यंत काँग्रेस पक्ष कनिष्ठ जातिंना मराठ्यांचा सहकारी मानत असे. तो समज संपून, कनिष्ठ जातिंचा स्वतंत्र विचार करणे, त्यांना भाग पडले, ज्या विशिष्ट मतदारसंघात कनिष्ठ जातींचा प्रभाव, संख्याबल अधिक होते, त्या मतदारसंघातील उमेदवारी काँग्रेस व अन्य राजकीय पक्षांनी त्या विशिष्ट जातीच्या उमेदवारास दिली. काँग्रेसने उमेदवारी नाकारलेले इतर मागास जातीचे नेते शिवसेना, भाजपात गेले. आपला सामाजिक पाया व्यापक करण्याच्या उद्देशाने या काँग्रेसेतर पक्षांनी आपली उमेदवारी अशा पूर्वाश्रमीच्या काँग्रेसजनांना दिली. परंतु १९९१ च्या लोकसभा निवडणूक निकालावर याचा परिणाम झाला नाही. कारण १९९१ मध्ये राजीव गांधीची हत्या झाल्याने या निवडणूकित काँग्रेसबद्दल सहानुभूतीचे वातावरण निर्माण झाले. तर पुढील काळात मात्र राजकीय व्यूहरचनेच्या दृष्टीने सर्व राजकीय पक्षांना इतर मागास जातींच्या राजकीय आकांक्षांची दखल घ्यावी लागली. त्यातून राजकीय प्रक्रिया बदलत गेली. याचा आढावा पुढीलप्रमाणे.

**१) भाजपा आणि इतर जाती :**

१९८० पासून सातत्याने इतर मागास जातिंचा पाठिंबा मिळावा म्हणून प्रयत्नशील असलेल्या भारतीय जनता पक्षाने मंडल आयोगाच्या शिफारसींची महाराष्ट्रात अंमलबजावणी करावी अशी मागणी केली. भाजपचा मूळ चेहराच उच्चजातीय, शहरी व मध्यमवर्गीय असल्याने कनिष्ठ जातिंना त्याच्याकडे वळवणे तसे अवघड होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाने मुंडे-डांगे-फरांदे या कनिष्ठ जातितील कार्यकर्त्याकडे महाराष्ट्र शाखेचे नेतृत्व सोपविले. त्यामुळे भाजपा कनिष्ठ जातिंना अनुकूल असल्याचे चित्र निर्माण झाले. हे नेते 'माधव' म्हणजेच माळी, धनगर व वंजारी जातीचे असल्याने या व अन्य इतर मागास जातींचा भाजपास पाठिंबा मिळत गेला. हा निर्णय वास्तव स्वरुपाचा असल्याचे भाजपाने दाखवून दिले. १९९५ सालच्या राजकीय सत्तांतरांनंतर महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीचे सरकार सत्तेवर आले. तेव्हा या मागात जातीतील नेतृत्वांना उपमुख्यमंत्री पद, विधिमंडळ नेतेपद अशी अनेक महत्त्वाची पदे दिली.

## २) शिवसेना आणि इतर मागास जाती :

शिवसेनेचे कनिष्ठ जातिचे राजकारण १९८५ नंतर आकार घेऊ लागले. भाजप व शिवसेना यांच्यातील मुख्य फरक त्यांच्या राखीव जागांबद्दलच्या भूमिकेचा दिसतो. शिवसेनेने एकूणच राखीव जागांच्या तत्वाबद्दल साशंक भूमिका घेते. राखीव जागा जातिच्या आधारे कशाला? राखीव जागांचा खरा फायदा कोणाला मिळतो? हे सेनेचे नेहमीच प्रश्न आहेत. किंबहुना दलितांसाठीच्या राखीव जागांमुळेच कनिष्ठ जातिच्या संधी हुकतात, असा समज करून देण्यात शिवसेना अग्रेसर राहिली. मात्र मराठा वर्चस्व आणि त्यातून कनिष्ठ जातिमध्ये असलेली अस्वस्थता याचा शिवसेनेने फायदा उठविला. आक्रमक भूमिका आणि रोखठोक भाषा यांच्या आधारे शिवसेनेने बिगरमराठा जातिच्या तरुणांना आकर्षित करून घेतले. मराठा आणि नवबौध्द यांच्यावर सेनेने आपल्या टीकेचा सगळा रोख ठेवला. महाराष्ट्रात सगळी सत्तास्थाने मराठ्यांनी बळकावली आणि सगळ्या सवलती नवबौध्दांना लाटल्या असा प्रचार केला. एकूणच ग्रामीण भागात कनिष्ठ जातीच्या पाठिंब्यांवर शिवसेनेने आपला जम बसविला. काँग्रेसवासी बुजुर्ग मराठा आणि दलित हे भूत शिवसेनेने कनिष्ठ जातींच्या बेकार तरूणांपुढे उभे केले. या सर्व शिदोरीवर शिवसेनेने १९९० च्या विधानसभा निवडणूकीत यश मिळविले. काँग्रेसमध्ये राहून मराठ्यांना अनेक तडजोडी कराव्या लागतात म्हणून मराठा महासंघाचे अण्णासाहेब पाटील यांनी जातिच्या आधारावर राखीव जागा देण्यास विरोध केला. विशेषतः कनिष्ठ जातिंना राखीव जागा देण्याच्या धोरणाला त्यांनी आक्षेप घेतला. यायाच अर्थ मंडल आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्यास ज्या मराठा नेत्यांचा विरोध होता ते शिवसेनेस अनुकूल झाले. अशा प्रकारे इतर मागास जातीविषयक आक्रमक धोरणाचा दुहेरी फायदा शिवसेनेला झाला. कोकण, मराठवाडा आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात शिवसेनेचा प्रसार होण्यास शिवसेनेचे आक्रमण धोरण उपयुक्त ठरले.

## ३) काँग्रेसची आणि इतर मागास वर्गीय :

काँग्रेस नेत्यांशी मराठा महासंघाच्या नेत्याचे संबंध घनिष्ठ असल्याने काँग्रेसला अडचणीत टाकणारी पावले महासंघ टाकत नाही. मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर महाराष्ट्र काँग्रेसचे संदिग्ध भूमिका घेऊन वेळ निभावून नेली होती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आपले मराठा अनुयायी आणि भाजप शिवसेनेसारखे कनिष्ठ जातींची बाजू घेणारे स्पर्धक यांचा समतोल साधण्याचा कसोशीने प्रयत्न चालवल्याचे दिसते. केंद्राने घोषणा केल्यावर काँग्रेसने 'केंद्राच्या सूचनेप्रामणे कार्यवाही' अशी हात झटकून टाकण्याची भूमिका घेतली. पण तत्वतः मात्र या शिफारसीचे स्वागतच केले. परिस्थितीचा अंदाज घेत पुढे त्यांनी ही मर्यादित भूमिका सोडून सर्व समाजघटकांचे समाधान करण्याचा उपाय, म्हणजे राखीव जागांचे प्रमाण वाढवण्याचे धोरण अंगिकारले. ते कनिष्ठ जातींसाठी राखीव जागा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठीही राखीव जागा अशी योजना काँग्रेस सरकारने

घोषित केली. धनगरांचा भटक्या विमुक्तांमध्ये समावेश, त्यामुळे भटक्या विमुक्तांसाठीच्या राखीव जागा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठी ३० टक्के राखीव जागा अशा प्रकारच्या योजनेला सर्व पक्षाचा पाठिंबा मिळविण्यात सरकार यशस्वी झाले.

या धोरणामुळे मराठा हितसंबंध जपले जातात; कनिष्ठ जातिशी जवळीक साधून भाजप व शिवसेना यांच्या भूमिका असंबद्ध ठरलीत आणि काँग्रेसची वाट सुकर होईल अशी काँग्रेस नेत्यांची धारणा होती. याबरोबरच वाढत्या खाजगीकरणामुळे खाजगी क्षेत्रात अधिक रोजगार उपलब्ध होणार असल्याने वरिष्ठ जातींना आकर्षक पगार व अधिकार पदे उपलब्ध होतील. पर्यायाने राखीव जागांच्या धोरणाचा फटका वरिष्ठ जातींना बसणार नाही. त्यामुळे राखीव जागांचे प्रमाण वाढवून कोणत्याच गटाची नाराजी ओढवून घ्यावी लागणार नाही. उलट सार्वत्रिक चांगुलपणाचे मानकरी मात्र होता येईल, अशी काँग्रेस पक्षाची मंडल आयोगाच्या शिफारसीबाबत व्यूहरचना होती. त्याद्वारे ओबीसींच्या असंतोषाची तीव्रता कमी करण्यात काँग्रेस पक्ष तात्पुरता यशस्वी झाला. मात्र या व्यूहरचनेची कार्यवाही करण्यापूर्वीच काँग्रेसने १९९५ साली सत्ता गमावली होती हे विसरून चालणार नाही.

**टीपा लिहा.**

**१. दलित राजकारण :**

**अ. प्रास्ताविक -**

महाराष्ट्राच्या राजकारणात 'दलित राजकारण' हा शब्दप्रयोग आता रूढ झाला आहे. अनुसूचित जातिना हिंदू व्यवस्थेत 'अस्पृश्य' म्हटले जायचे. गांधींनी त्यांच्याकरिता 'हरिजन' तर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी 'शोषित जाति' या शब्दप्रयोगाचा वापर केला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात या पददलित जाती-जमातींच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्याकरिता राज्यघटनेत राखीव जागांची तरतूद करण्यात आली. त्याकरिता केंद्र व राज्य सरकारांनी अशा जातींची यादी तयार करण्याची पद्धत सुरू केली. अशा प्रकारच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या जातींचा उल्लेख अनुसूचित असा केला जातो. मात्र या जातिसमुहातील लोक स्वतःला दलित म्हणवून घेणे पसंत करतात. महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जातिच्या सूचीत ५९ जातिसमुहांचा समावेश आहे. डॉ. आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या ७५,००० अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. पूर्वाश्रमीच्या 'महार' जातीच्या आणि धर्मांतर केलेल्या जनसमुदायाचा ‘नवबौध्द' असा उल्लेख करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातिच्या यादीत समाविष्ट असणाऱ्या जातिंना १९६२पासून सवलती व आरक्षणे दिली. त्यामुळे 'दलित' जातिसमूहात अनुसूचित जात व नवबौध्दांचा समावेश होत असतो. अलिकडच्या काळात काही अभ्यासक अनुसूचित जमातीचाही 'दलित' सदरात समावेश करतात.

**ब. स्वातंत्र्योत्तर कालखंड :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात डॉ. आंबेडकरांनी प्रथमतः बहिष्कृत जाति महासंघ त्यानंतर स्वतंत्र मजूर पक्ष आणि १९४६ च्या सुमारास शेड्युल्ड कास्टस् फेडरेशन या राजकीय पक्षांची स्थापना केली. डॉ. आंबेडकर जरी दलितांचे एकमेव नेते असले, तरी त्यांचा प्रभाव मराठी भाषिक प्रदेशापूरता मर्यादित होता.

१९५१-५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. आंबेडकरांच्या शॅड्युल्ड कास्टस् फेडरेशनने शेतकरी कामगार पक्षाबरोबर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र आणि समाजवादी पक्षाबरोबर मुंबई शहरापुरता निवडणूक समझोता केला. राजभोज यांचा अपवाद वगळता शॅ.का.फे. चे डॉ. आंबेडकरांसह सर्व उमेदवार लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले. विधानसभेत त्यांच्या पक्षाचे केवळ तीन उमेदवार निवडून आले. स्वतःचा आणि आपल्या पक्षाचा असा दारूण पराभव डॉ. आंबेडकरांना अपेक्षित नसावा. अनुसूचित जाती जमातींकरिता असलेल्या राखीव जागांबाबत त्यांचा भ्रमनिरास झाला. १९५५ साली पक्षाचे सरचिटणीस आणि एकमेव खासदार राजभोज यांनी पक्षाचा त्याग करून काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या धक्क्यातून सावरत असताना राजकारण करण्याऐवजी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुरू असलेले समाजकारण करावे असा विचार त्यांनी या कालखंडात व्यक्त केला. त्यांचा हा विचार त्यांच्या सहकाऱ्यांना अमान्य होता. आपला पक्ष अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने शॅड्युल्ड कास्टस् फेडरेशनच्याऐवजी सर्व शोषित वर्गाचा प्रातिनिधिक असा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव डॉ. आंबेडकरांनी मांडला.

डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी त्यांच्या मृत्युनंतर १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली असली, तरी ते डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या पद्धतीने पक्ष चालवू शकले नाहीत. बात्यांच्या अनुयायांना राजकारणातच रस वाटत होता आणि आजही वाटतो. पण ते राजकारणही त्यांना धड जमले नाही. रिपब्लिकन पक्ष प्रादेशिक पातळीवरही त्यांना बांधता आला नाही. आजही तो पक्ष एका जातीपुरताच पक्ष राहिला आहे. इतकेच नव्हे तर, त्यात अनेक गट झाले.

**क. पक्षातील गटबाजी :**

रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासून आतापर्यंतचा इतिहास हा नेत्यांमधील संघर्षातून झालेल्या फाटाफुटीचा व विघटनाचा इतिहास आहे. १९५७ साली पक्षाने महाराष्ट्र विधानसभेच्या तेरा जागा जिंकून चांगले यश मिळवले, याचे बरेचसे श्रेय दलित नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती बरोबर केलेल्या युतीला जाते. संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर सहकार्य करण्याच्या प्रश्नावरून १९५९ साली बी. सी. कांबळे यांच्या नेतृत्वाखालील गट रिपब्लिकन पक्षातून बाहेर पडला. कारण त्यांचा समितीतील साम्यवाद्यांच्या प्रभावाला आक्षेप होता. काही अभ्यासकांचे मते ही फूट उच्चशिक्षित व अल्पशिक्षित दलित नेत्यांमधील पक्षावर आपला प्रभाव प्रस्थापित करण्याच्या स्पर्धेची परिणती होती. कांबळेंनी आपला

वेगळा पक्ष स्थापन केला. त्याला ते 'दुरूस्त पक्ष' असे म्हणत. गायकवाड गटाने समितीबरोबरची युती कायम ठेवली व विधानसभेच्या तीन जागा मिळाल्या. कांबळे गटाला प्रजासमाजवादी पक्षाबरोबर केलेल्या युतीचा काहीही फायदा झाला नाही.

**ड. महाराष्ट्र निर्मितीनंतरचे दलित राजकारण :**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर रिपब्लिकन पक्षाच्या विघटनाला थोडे वेगळे स्वरूप आले. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणाचा भाग म्हणून दलित नेत्यांना काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. १९६९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी सर्वप्रथम आर. डी. भंडारे काँग्रेसमध्ये दाखल झाले व त्यांच्यानंतर प्रां. नरेंद्र कांबळे, दादासाहेब रूपवते इत्यादी मंडळे आपल्या अनुयासांसह काँग्रेसमध्ये आली. दुसऱ्या बाजूने चव्हाणांनी रिपब्लिकन पक्षाच्या गायकवाड गटाबरोबरही युतीची बोलणी सुरू केली, परंतु जागा वाटपाच्या प्रश्नावरून मतभेद झाल्यामुळे गायकवाड गटाने समितीबरोबर सहकार्य चालू ठेवले. या निवडणुकीत त्यांना केवळ चार जागा मिळाल्या. यानंतर मात्र गायकवाड गटाने काँग्रेस विरोधी भूमिका बदलली आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस बरोबर युती केली. काँग्रेस बरोबर सहकार्य करणाच्या प्रश्नावरून १९७० साली रिपब्लीक पक्षात पुन्हा एकदा फूट पडली. विदर्भातील नेते बॅ. राजाभाउ खोब्रागडे यांनी आपला स्वतंत्र गट निर्माण केला. अशा तऱ्हेने रिपब्लिकन पक्षाचे तीन गटात विभाजन झाले. १९७२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत या सर्वांना मिळून एक जागा मिळवता आली. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या कांबळे गटाने जनता पक्षाशी युती केली आणि बी.सी. कांबळे लोकसभेवर निवडून गेले. युतीच्या राजकारणाद्वारे १९८० ते १९९० च्या काळात पक्ष उत्तरोत्तर निष्प्रभ होत असल्याची जाणीव दलित नेतृत्वास झाली. शिवसेना-भाजपाचा हिंदुत्ववादी शक्तींच्या निवडणुकात पक्षाचे प्रत्येकी एक उमेदवार विधानसभेवर निवडून आले. निवडणुकीच्या राजकारणात रिपब्लिकन वाढत्या प्रभावामुळे काँग्रेस पक्षाशी समजोता करावा हा विचार पक्षात उत्तरोत्तर प्रभावी होत गेला. मात्र २००९ सालच्या विधानसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीत सामील होण्याचा निर्णय फलदायी ठरला नाही.

रिपब्लिक पक्षातील फाटाफुटीमुळे सर्वसामान्य दलित जनतेचा त्यांच्या नेत्यांबाबत भ्रमनिरास झाला. काँग्रेसबरोबर केलेल्या युतीच्या राजकारणातून काही मूठभर नेत्यांचा वैयक्तिक फायदा झाला, परंतु रिपब्लिकन पक्षाचे व आंबेडकरी चळवळीचे मात्र अतोनात नुकसान झाले. एकमेकांशी भांडणाऱ्या दलित नेत्यांनी दलितांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न न केल्यामुळे सर्वसामान्य दलितांमध्ये व विशेषतः नवशिक्षित दलित तरूणांमध्ये एका बाजूला नैराश्याची भावना वाढत गेली तर दुसऱ्या बाजूला आपली स्थिती सुधारण्यासाठी संघर्ष करण्याची भावना वाढत गेली. ही कोंडी फोडण्याच्या उद्देशाने १९७२ साली दलित पॅंथरसारख्या लढाऊ संघटनेचा उदय झाला. या संघटनेचे नेतृत्व राजा ढाले, नामदेव ढसाळ

यांच्यासारख्या तरुण साहित्यिकांकडे होते. परंतु पुढे ही संघटना देखील मतभेदांमुळे फुटली. बौध्द तत्त्वज्ञान व विचाराच्या आधारावर दलित चळवळीचे संघटन असणाऱ्या राजा ढालेंनी 'मास मूव्हमेंट' ही वेगळी संघटना काढली. नामदेव ढसाळानी दलित पँथर या नावाने काम चालू ठेवले. प्रा. अरूण कांबळे आणि रामदास आठवले यांनी भारतीय दलित पँथर या नावाने कार्य चालू ठेवले. अरूण कांबळे पढे १९८९ मध्ये जनता दलात गेले.

१९७८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात दंगली झाल्या. त्यावेळी दलितांच्या संरक्षणाचा प्रश्न महत्वाचा मानून जोगेंद्र कवाडेंनी दलित मुक्ती सेनेची स्थापना केली व अत्यंत आक्रमक पद्धतीने सवर्णांच्या विरोधात कार्य सुरू केले. थोडक्यात म्हणजे रिपब्लिकन पक्षाच्या फाटाफुटीतून दलित समाजाचे केवळ राजकीय क्षेत्रातच विघटन झाले असे नाही तर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही दलितांमध्ये फूट पडली. परिणामतः दलितांची शक्ति क्षीण झाली व त्याचा फायदा घेऊन हितसंबंधी गटांनी ग्रामीण क्षेत्रात शेतजमीनी, गायरानासारख्या प्रश्नावर व शहरी क्षेत्रात राखीव जागा, सवलतींसारख्या प्रश्नावर दलित विरोधी भूमिका घेऊन संघर्ष सुरू केला.

रिपब्लिकन पक्षाच्या फाटाफुटीमुळे दलितांचे नुकसान होत आहे. या जाणिवेतून अनेक दलित नेत्यांनी वेळोवेळी ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न केले. भैय्यासाहेब ओंडकरांनी फुट पडू नये यासाठी १९५८ मध्ये व १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दोन्ही गटांची जबरदस्त पीछेहाट झाल्यावर या गटांना एकत्र आणण्यात पुढाकार घेतला. १९६७ च्या निवडणुकांपूर्वी दादासाहेब रूपवतेंनी तर १९७१ साली बी. सी. कांबळेंनी पुढाकार घेतला. हे सर्व प्रयत्न दलित नेत्यांच्या भूमिकांमुळे अयशस्वी ठरले. १९७४ साली मुंबईमध्ये झालेल्या सर्व-दलित संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दलित पॅंथर्सनी एकत्र येण्याशिवाय पर्याय नव्हता. परंतु या सर्वांना एकत्र असणारी पॅंथर्स संघटना फुटल्यामुळे हा प्रयत्नदेखील फसला.

९ व्या लोकसभेसाठी रिपब्लिकन पक्षाने वेगवेगळया पक्षांबरोबर युती करून निवडणुका लढवल्या. गवई, रामदास आठवले यांनी काँग्रेसबरोबर, तर प्रकाश आंबेडकरांनी काँग्रेसविरोधी राष्ट्रीय मोर्च्याबरोबर युती केली. या संदर्भात आंबेडकरांची भूमिका ही होती की तात्कालिक परिस्थितीत काँग्रेस पक्ष हा शत्रू क्रमांक एक असून भाजपा-शिवसेना युतीचा धोका त्यापेक्षा कमी आहे. या भूमिकेमुळे अनेकांची आंबेडकरांवर भाजपा-शिवसेना या जातीयवादी युतीला अप्रत्यक्षपणे सहाय्य केल्याची टीका केली. परिणामी निवडणुकांनंतर आपल्या नेत्यांवर ऐक्यासाठी दबाव आणण्याच्या दृष्टीने सिद्धार्थ नगरातील नऊ दलित युवकांनी आमरण उपोषण केले. १९ डिसेंबर १९८९ रोजी झालेल्या बैठकीत तेरा संघटना व गटांचे नेते उपस्थित होते. त्यांनी आपल्या संघटना व गटांचे विसर्जन करून डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आल्याची घोषणा केली.

१९९० ते १९९६ या कालखंडात रिपब्लीकन पक्षातील मतभेद उत्तरोत्तर तीव्र होत गेले. महाराष्ट्राच्या राजकारणात दलित शक्ती निष्प्रभ झाली. १९९५ साली महाराष्ट्रात

शिवसेना-भाजपा युती सत्तेवर आल्यानंतर पुन्हा एकदा रिपब्लीकन पक्षातील ऐक्य प्रक्रियेला गती मिळाली. १९९७ साली मुंबईत झालेल्या दंगलीनंतर पुन्हा एकदा दलित ऐक्याची प्रक्रिया सुरू झाली. १९९८ साली पंक्षार्तगत मतभेद असताना रिपब्लीकन पक्षाने काँग्रेस बरोबर निवडणूक समजोता केला. १९५७ नंतर रिपब्लीकन पक्षाला उल्लेखनीय यश मिळाल्याने पक्षातील मतभेदाची अटी कमी होण्यास आणि नेत्यातील ऐक्य टिकण्यास हातभार लागला. हे सामंजस्य २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या अपयशानंतर संपुष्टात आले. २००९ साली पुन्हा एकदा दलित ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

वरील ऐक्याचा पाया संकुचित होता. वास्तविक पहाता डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचे स्वरूप सर्व दलित जाती-जमाती, पीडित, शोषित गटांचे प्रतिनिधत्व करणारा पुरोगामी विचाराचा राजकीय पक्ष असे होते. स्थापनेपासूनच महाराष्ट्रात तरी रिपब्लिकन पक्षाची प्रतिमा नवबौध्दांचा पक्ष अशीच बनलेली आहे. कारण या पक्षाचे बहुतेक नेते डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने धर्म स्वीकारलेल्या महार जातीतले आहेत. दलितांमधील मांग, ढोर, चांभार व अन्य लहान-मोठ्या जाति- बुद्ध जमातींना या पक्षात फारसे स्थान नाही. बौध्देतर दलित प्रामुख्याने काँग्रेस पक्षाबरोबर आहेत. अलिकडच्या काळात त्यांच्यातील काही जाती-गटांचा शिवसेनेला पाठिंबा आहे. आदिवासी, विमुक्त व भटक्या जाति-जमातीं या स्वतंत्र संघटना आहेत परंतु त्यांच्यात रिपब्लिकन पक्षाचे गट व दलित पॅंथर्स किंवा मास मुव्हमेंट सारख्या संघटना यांच्यात फारसा राजकीय संपर्क नाही. काही वेळा समान प्रश्नावर सर्वजण एका व्यासपीठावर येत असतीलही, परंतु त्यांच्यात सातत्यपूर्ण संवाद असल्याचे दिसत नाही. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांचे ऐक्याचे प्रयत्न या संघटनाना फारसे आकर्षित करू शकले नाही. ऐक्य प्रक्रिया गतिमान असताना या सर्व दलित शोषित गटांना या प्रक्रियेत सामील होण्याचे आवाहन केले होते, परंतु त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

२०१४ साली आठवले यांच्या नेतृत्वाखालील गटाने भाजपाबरोबर युती करून निवडणुका लढवल्या. पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. मात्र दलित मतपेढी आपल्याकडे असावी, यासाठी रामदास आठवले यांना राज्यसभेत पाठवण्यात आले व नंतर राज्यमंत्री करण्यात आले. मागचे पान पुढे या न्यायाने आठवले गट यांना भाजपाच्या दावणीला बांधला गेला.

Dr. Dattatray Saudagar, Sawant,
Head, Dept. of Political Science,
Arts, Commerce and Science College, Lanja